लोकमत

# खासगीकरणामुळे सहकार उद्ध्वस्त होण्याची भीती : ककडे

## आजऱ्यात 'रवळनाथ' कडून सभासदांना प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पेरणोली :** शासन सर्वच क्षेत्रांचे खासगीकरण करीत आहे. त्यामुळे दुर्बल व गरिबांचा आधार असलेल्या सहकार क्षेत्राचे खासगीकरण झाल्यास भविष्यात सहकार उद्ध्वस्त होणार असल्याची भीती शिवाजी विद्यापीठाचे माजी अर्थशास्त्र प्रमुख डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केली.

आजरा येथे रविवारी रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे आयोजित सभासदांना प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. ककडे म्हणाले, सहकार व राजकारण या नाण्याच्या दोन बाजू असल्या तरी सत्तेच्या हव्यासापोटी सहकार मोडीत निघाला. तरुणांमध्ये सहकार रुजवून सहकार बळकट करणे आवश्यक आहे.

यावेळी प्रा. संभाजी जाधव, ॲड. एस. एस. गडगे यांनी मार्गदर्शन केले.



आजरा येथील रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या सभासदांना प्रा. डॉ. विजय ककडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एम. एल. चौगुले, विनायक आजगेकर, संभाजी जाधव, एस. एस. गडगे, व्ही. के. मायदेव, आदी उपस्थित होते.

संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात सभासदांसाठी पहिल्यांदाच प्रशिक्षण घेतल्याचे सांगितले.

कृष्णा येसणे, डॉ. अंजनी देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, शाखाध्यक्ष विनायक आजगेकर, प्रा. डॉ. शिवशंकर उपासे, नूरजहाँ सोलापुरे, उत्तम दळवी, आदी उपस्थित होते. मीना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य राजीव टोपले यांनी आभार मानले.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 22, 2021
Powered by: erelego.com

तरुण भारत
सोमवार, २२ फेब्रुवारी २०२१

# संस्थावाढीसाठी सभासदांचे योगदान महत्त्वाचे

## प्रा. संभाजी जाधव : आजऱ्यात रवळनाथच्यावतीने सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी
आजरा

सभासद हा संस्थेचा मालक आहे. सभासदास त्याचे अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदारी याची जाणीव असणे आवश्यक आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे सभासद असल्याचे मत तात्यासाहेब मोहिते प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक प्रा. संभाजी जाधव यांनी व्यक्त केले. आजरा येथे रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या सभासद मार्गदर्शन मेळाव्यात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठ माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. विजय ककडे यांच्या हस्ते कुंडीतील रोपांना पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

स्वागत आजरा शाखा चेअरमन प्रा. विनायक आजगेकर यांनी केले. प्रास्ताविकामध्ये अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सभासदांना आपल्या हक्क व अधिकाराची जाणीव व्हावी



आजरा : येथील रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या सभासदांना मार्गदर्शन करताना प्रा. संभाजी जाधव. यावेळी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, प्रा. विजय ककडे, ॲड. एस. एस. गडगे, प्रा. व्ही. के. मायदेव आदि.

आणि संस्थेच्या कारभारात त्यांचा सहभाग वाढावा हाच उद्देश असून संस्थेच्या सर्व शाखांच्या ठिकाणी असे प्रशिक्षण कार्यशाळा घेण्याचे नियोजन असल्याची माहिती दिली. यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव हे आजरा महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जाधव म्हणाले, कोणत्याही सहकारी संस्थेचे नियंत्रण, संचालक, सभासद व कर्मचारी हे चार प्रमुख घटक असून या प्रत्येक घटकाने आपले कर्तव्ये व्यवस्थित बजावले तरच कोणतीही संस्था प्रगतीच्या दिशेने यशस्वरित्या वाटचाल करू शकते.

प्रा. ककडे यांनी सभासद हा सहकाराचा पाया असून आदर्श उपविधीनुसार सभासदाचे हक्क, कतव्ये आणि जबाबदाऱ्या याबाबत सभासदांनी प्रशिक्षित असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सहकारी संस्थेच्या कारभारात सहभाग वाढविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी फेडरेशन ऑफ मल्टी–स्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटीचे संस्थापक सल्लागार ॲड. एस. एस. गडगे यांनी बहुराज्य सहकारी संस्था कायदा, इतिहास व कर्जवसुलीविषयक प्रचलित कायदे व तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. उपस्थित सभासदांमधून के. व्ही. येसणे, डॉ. अंजनी देशपांडे यांनी कार्यशाळेबद्दल मनोगत व्यक्त केले.

यावेळी आजरा शाखेचे सल्लागार प्रा. शिवशंकर उपासे, सौ. नुरजहाँ सोलापूरे, जनार्दन दळवी, किरण प्रधान, वैजनाथ बचुटे, मधुकर भारती, चंद्रकांत पारपोलकर, नामदेव होडगे, अपर्णा उपासे, शितल हरेर, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने तसेच सभासद उपस्थित होते. संचालिका मीना रिंगणे यांनी सूत्रसंचलन केले तर आजरा शाखा सल्लागार प्रा. राजीव टोपले यांनी आभार मानले.